# पोलीस स्टेशन मालेगांव जिल्हा वाशिम

पत्ता - जुने बस स्टँड जवळ, मालेगांव,जि वाशिम दुरध्वनी क्रमांक 07254- 271253

Email ID- ps.malegaon.wsm@gov.in


## !! प्रेसनोट !!

### रात्रग्रस्त दरम्यान मालेगांव पोलीसांनी घडविले माणुसकीचे दर्शन

दि.06.01.2022 रोजी रात्री दरम्यान मालेगांव पोलीस स्टेशन चे रात्र ग्रस्तीवर असलेले पोलीस उपनिरीक्षक श्री.रामकिशन जायभाये सोबत बिट मार्शल मधील पोलीस अंमलदार पोहेकॉ रविंद्र लोंखडे व पोलीस नाईक सुधीर सोळंके चालक पोकॉ किशोर नवलकर असे सरकारी वाहनाने मालेगांव शहरात रात्रग्रस्त करीत असतांना सौ.उषा पुष्पकुमार मिसाद वय 27 वर्ष रा.छत्तीसगड येथील गरोदर महिला पुणे ते छत्तीसगड जाणा-या ट्रॅव्हल्स मध्ये प्रवास करत होती अचानक त्या महिलेला पोटात असहय वेदना सुरू झाल्या त्या गरोदर महिलेसोबत तिच्या नातेवाईका पैकी कोणीही सोबत नव्हते व सदर महिलेची मालेगांव शहर नजीक प्रवासा दरम्यानच प्रसुती झाली त्यावेळी रात्रग्रस्त करत असलेली पोलीस व्हॅन सदर ट्रॅव्हल्स चालकाला दिसली व त्यांनी पोलीसांची गाडी थाबंवुन ट्रॅव्हल्स मधील गरोदर महिला होणाऱ्या त्रासाबद्दल सांगीतले पोलीस उपनिरीक्षक श्री.रामकिशन जायभाये सोबत बिट मार्शल मधील पोलीस अंमलदार पोहेकॉ रविंद्र लोंखडे व पोलीस नाईक सुधीर सोळंके यांनी समस्या जाणुन घेवुन त्यांना तातडीने शासकीय रूग्लालय मालेगांव येथे भरती केले व थंडीचे वातावरण असल्यामुळे पोलीस अंमलदारांनी महीला व तिचे बाळाकरीता उबदार कपडयाची व्यवस्था केली. सदर महिलेची प्रकृती आता चांगली असुन सदर महिलेच्या नातेवाईकांसोबत संपर्क करून त्याचे गावी छत्तीसगड येथे नेण्यात आले आहे.

वाशिम जिल्हयाचे पोलीस अधिक्षक मा.श्री.बच्चनसिंग साहेब व मालेगांव पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री.प्रविण धुमाळ साहेब त्यांचे अधिनस्त असलेल्या पोलीसांकडुन जनतेला त्यांचे अडचणीत व संकटकाळात मदत व सहकार्य पुरविण्याकरीता नेहमीच प्रयत्नशिल असतात यावरून निदर्शास आले आहे. सदर महिला व नातेवाईकाने मदतीला धावुन येणाऱ्या वाशिम पोलीसांचे आभार मानले

Sd/- Inv. PSI.

पोलीस निरीक्षक

पोलीस स्टेशन मालेगांव वाशिम

पोलीस स्टेशन अधिकारी

पो.स्टे.मालेगांव जि.वाशिम